पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११०१८
नगरसचिव कार्यालय,
क्रमांक-नस/३/कावि/३४३/२०२२.
दिनांक-०४/०३/२०२२.

प्रति,
मा. ............................................................ ,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११०१८.

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. स्थायी समितीची साप्ताहिक सभा दिनांक.१०/०३/२०२२ रोजी आयोजित केलेबाबत.

महोदय/ महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा गुरुवार, दिनांक.१०/०३/२०२२ रोजी **सांय.०५.००** वा. मा.अवर सचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जानेवारी २०२२ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करण्यात आली आहे. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील व्हिडीओ कॉन्फरन्स रुम मधून मा.सभापती, स्थायी समिती हे सभा संचलित करणार आहेत. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण ऑनलाईन पध्दतीने सहभागी व्हावे, ही विनंती.

आपला विश्वासू,



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११०१८.

प्रत- १) सर्व संबंधित शाखा प्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११०१८.**
**मा.स्थायी समिती**
**कार्यपत्रिका क्रमांक – २६६**

दिनांक-१०/०३/२०२२ वेळ सांय.०५.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा गुरुवार, दिनांक.**१०/०३/२०२२** रोजी **सांय.०५.००** वा. मा.अवर सचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जानेवारी २०२२ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करण्यात आली आहे. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील व्हिडीओ कॉन्फरन्स रुम मधून मा.सभापती, स्थायी समिती हे सभा संचलित करणार आहेत. सभेत खालील कामकाज होईल.

----------

अ)मा.स्थायी समिती कार्यपत्रिका क्र.२६३ दि.१८/०२/२०२२ व दि.२३/०२/२०२२ चा सभावृतांत कायम करणे.

ब)मा.स्थायी समिती कार्यपत्रिका क्र.२६४ दि.२८/०२/२०२२ चा सभावृतांत कायम करणे.

विषय क्र.१) पिं.चिं.म.न.पा.चे अ,क,इ व फ क्षेत्रीय कार्यालय पाणीपूरवठा विभागाचे वापरासाठी आवश्यक असलेले ८००० लि.क्षमतेचे ०५ नग व ६००० लि.क्षमतेचा ०१ नग वॉटर टँकर असे एकुण ०६ नग वॉटर टँकर निविदा न मागिविता करारनामा न करता थेट पद्धतीने मे.टाटा मोटार्स लि.पुणे यांचेकडून शासकीय दराने **(GEMPORTAL**खरेदी दर )खरेदीकामी र.रू.१,४९,१५,४०० मे.टाटा मोटार्स यांना आगाऊ स्वरूपात आदा करणेस व सदर वाहनाचे उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे नोंदणी कामी प्रति वाहन र.रु.१०,०००/- या प्रमाणे ०६ नग वाहनांकरीता र.रु.६०,०००/- असे एकुण र.रु.१,४९,७५,४००/-(अक्षरी र.रु.एक कोटी एकोणपन्नास लाख पंच्याहत्तर हजार चारशे फक्त ) चे खर्चास अथवा प्रत्यक्ष खरेदीचेवेळेस येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.70/36/2021-22 अन्वये प्रभाग क्र.१५ मधील दुर्गादेवी टेकडी उद्यान व गणेश तलाव उद्यान व इतर उद्यानात स्थापत्य विषयक कामे करणे कामी MS.RAJESH SUBHASH JADHAV नि.र.रू.29,99,935/- (अक्षरी र.रु.ऐकोणतीस लाख नव्यान्नव हजार नऊशे पस्तीस फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.29,83,385/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.29,83,385/- पेक्षा 35.51% कमी म्हणजेच र.रु.19,23,985/- +रॉयल्टी चार्जेस र.रु.38,188/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.16,550/- = एकुण र.रु.19,78,723/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये

झालेली वाढ/ घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.३) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.CIVIL/HO/75/01/2021-22 अन्वये प्र.क्र.२१ मधील पिंपरी गाव येथील स्मशानभूमीचे नुतनीकरण करणे कामी प्रसाद बबन देवकर नि.र.रू.1,49,77,014/- (अक्षरी र.रु.एक कोटी एकोणपन्नास लाख सत्याहत्तर हजार चौदा फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.1,48,71,864/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.1,48,71,864/- पेक्षा 29.99% कमी म्हणजेच र.रु.1,04,11,792/- +रॉयल्टी चार्जेस र.रु.1,36,521/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.1,05,150/- = एकुण र.रु.1,06,53,463/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/ घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.४) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीच्या मंजूर विकास योजनेतील मौजे चिखली मधील गट नं.१५९४ ते गट नं.१६५४ ( गायरान ) या मिळकती मधून जाणा-या १८.०० मी.रुंद रस्त्याचे कडेने जे चिखली येथिल गट नं.१६५४ या मिळकतीमध्ये महानगरपालिकेकडून विकसीत होत असलेल्या जलशुध्दीकरण केंद्राकडे जाणारी अशुध्द जलउपसा जलवाहीनी ( व्यास – १४०० मी.मी.) व जलशुध्दीकरण केंद्रामध्ये शुध्दीकरण झाल्यानंतर परिसरामध्ये शुध्द पाण्याचा पुरवठा करण्यासाठी टाकावयाची जलवाहिना ( व्यास – १२०० मी.मी.) या दोन्ही जलवाहीन्या ह्या याच १८.०० मी.रुंद रस्त्याच्या कडेने टाकण्याचे महानगरपालिकेचे नियोजन होते. त्यानुसार जलशुध्दीकरण केंद्राकडे जाणारी अशुध्द जलउपसा जलवाहीनी (व्यास–१४०० मी.मी.)टाकण्यात आलेली असून सदरची जलवाहिनी टाकताना मुख्यत्वेकरुन गट नं.१५९४ या मिळकती मधिल मिळकतधारकांची अंशतः घरे पाडण्यात आलेली होती. तथापी आता जलशुध्दीकरण केंद्रामध्ये शुध्दीकरण झाल्यानंतर परिसरामध्ये शुध्द पाण्याचा पुरवठा करण्यासाठी टाकावयाची जलवाहिना (व्यास–१२०० मी.मी.) टाकण्यासाठी संबंधित मिळकतधारकांची उर्वरित राहिलेली घरे काढल्यानंतरच सदरची जलवाहिनी टाकता येणार आहे. गट नं.१५९४ ते गट नं.१६५४ पर्यंतच्या मिळकती मधून जाणा-या १८.०० मी. रुंद रस्त्याने बाधित मिळकतधारकांचे पैकी काही मिळकतधारकांचे प्रस्ताव महानगरपालिकेस प्राप्त झालेले असून त्यावरिल महानगरपालिकेची प्रशासकिय कार्यवाही सुरु आहे. तर काही मिळकतधारकांच्या शासकिय मोजणी नकाशे त्यांना उपलब्ध झालेले नसल्याने त्यांचे कडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्यावर तात्काळ प्रशासकिय कार्यवाही करणे आवश्यक आहे. वरिल कार्यवाही करताना ज्या मिळकतधारकांच्या शासकिय मोजणी नकाशे झालेले नाहीत त्यांची शासकिय मोजणी महानगरपालिकेमार्फत करणे.(शासकिय मोजणी फी देय नुकसान भरपाई

रकमेमधून वजा करुन घेण्याचे अटीवर) व महानगरपालिकेस प्राप्त झालेले प्रस्तावाच्या खरेदीखतासाठी बाधित क्षेत्राची नुकसान भरपाई रक्कम, तसेच रस्ता बाधित क्षेत्राच्या खरेदीखतासाठीची स्टँम्प ड्युटी, रजिस्टेशन फी, वकिल फी व इतर रक्कमा निश्चित करुन नुकसान भरपाई रक्कम संबंधित जागा मालकस व खरेदीखतासाठीची स्टँम्प ड्युटी, रजिस्ट्रेशन फी, वकिल फी व इतर रक्कम संबंधित वकिलास अदा करणे आवश्यक आहे. तथापी सध्याच्या मा.स्थायी समितीची मुदत ही दि.१३/०३/२०२२ रोजी संपत असल्याने खरेदीखतासाठी बाधित क्षेत्राची नुकसान भरपाई रक्कम, तसेच रस्ता बाधित क्षेत्राच्या खरेदीखतासाठीची स्टँम्प ड्युटी, रजिस्टेशन फी, वकिल फी व इतर रक्कमा संबंधित जागा मालकास व संबंधित वकिलास अदा करताना अडचणी निर्माण होऊ शकतात. तथापी जलशुध्दीकरण केंद्रामध्ये शुध्दीकरण झाल्यानंतर परिसरामध्ये शुध्द पाण्याचा पुरवठा करण्यासाठी टाकावयाची जलवाहिनी(व्यास – १२०० मी.मी.) ह्या तातडीने टाकावयाच्या असल्याने वरिल प्रकरणी मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करणे आवश्यक आहे. तरी ज्या मिळकतधारकांच्या शासकिय मोजणी नकाशे झालेले नाहीत त्यांची शासकिय मोजणी महानगरपालिकेमार्फत करणे.(शासकिय मोजणी फी देय नुकसान भरपाई रकमेमधून वजा करुन घेण्याचे अटीवर) व महानगरपालिकेस प्राप्त झालेले प्रस्तावाच्या खरेदीखतासाठी बाधित क्षेत्राची नुकसान भरपाई रक्कम, तसेच रस्ता बाधित क्षेत्राच्या खरेदीखतासाठीची स्टँम्प ड्युटी, रजिस्ट्रेशन फी, वकिल फी व इतर रक्कमा निश्चित करुन नुकसान भरपाई रक्कम संबंधित जागा मालकास व खरेदीखतासाठीची स्टँम्प ड्युटी, रजिस्ट्रेशन फी, वकिल फी व इतर रक्कम संबंधित वकिलास अदा करणेकामी मान्यता देणेबाबत विचार करणे.

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८, नगरसचिव विभाग
क्रमांक- नस/३/कावि/३४३/२०२२.
दिनांक-०४/०३/२०२२.

टिप-प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.